# चित्शक्ती विलास

## स्वामी मुक्तानंद

या ठिकाणी मी एक सत्य गोष्ट सांगू इच्छितो, की ज्यामुळे ध्यानाचा उपासक दृढ निष्ठावान बनेल आणि त्याच्या शरीरात चितिशक्तीचा प्रभाव आणि श्रीगुरुदेवांच्या प्रत्यक्ष अस्तित्वाची पूर्ण आस्तिक्य बुद्धी राहील. त्याने विचार करावा, की जसे त्याचे नाक, कान, नेत्र, जिव्हा आणि मुख सत्य आहेत; तसेच त्याच्या अंतरी व्यापून असलेले श्रीगुरू सत्य आहेत. प्रिय सिद्धविद्यार्थ्यांनो! या विषयाचे सूक्ष्मतेने मनन करा. श्रीगुरू आणि पारमेश्वरी अनुग्राहिका शक्ती यांच्यावर पक्की निष्ठा ठेवा.

थोडा विचार करा. जेव्हा एक डॉक्टर शरीराच्या कोणत्यातरी एका जागी इंजेक्शन देतो, तेव्हा ते सर्व शरीरात प्रत्यक्षरूपात पसरते. तुम्हाला काही अशा इंजेक्शनांचाही अनुभव असेल ज्यांच्या प्रभावामुळे शरीरातील रक्त तापते किंवा जर कोणी वैद्यराजांनी दिलेली छोटीशी गुटिका खाल्ली, तर शरीराचा रोग निघून जातो. त्याचा केवढा गुण आहे, त्याची किती शक्ती आहे जी तुमच्या नसानसांमध्ये, शरीराच्या अणुअणूंमध्ये पसरू शकते आणि पसरून तेथील आजाराला दूर करते. हा तर तुमचा प्रत्यक्ष अनुभव आहे.

अगदी त्याच प्रकारे सद्गुरू ब्रह्मानंदरूपाने विलसत असलेल्या पराशक्तीला घेऊन, साऱ्या अनर्थांच्या कारणरूप असलेल्या अविद्येचा संहार करणाऱ्या शक्तीला घेऊन, दीक्षेच्या निमित्ताने, तुमच्यामध्ये प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रूपाने दृष्टी, शब्द वा संकल्प, सहवास किंवा कोणत्याही अंगाच्या स्पर्श-क्रियेने स्वतःच प्रवेश करीत असतात. प्रवेश करून सप्तधातूंत सप्तधातुमय होऊन, सर्व इंद्रियांत सर्व इंद्रियमय होऊन, पंचकोषांत कोषमय होऊन, नखशिखांत तुमच्या आतमध्ये मूर्तिमंत होऊन राहतात. मग तुम्हाला आतून मार्गदर्शन मिळणे, साक्षात्कार होणे फारसे कठीण नाही.

अशा गुरूंच्या ज्ञानापासून दूर, प्रेमापासून दूर, निष्ठेपासून दूर आणि आज्ञापालनापासून दूर राहिल्याने तेसुद्धा तुमच्यापासून दूर जातात. वस्तुतः ते मूर्तिमंत होऊन तुमच्या अंतरी क्रियाशक्तीच्या रूपात राहत असतात. तुमच्या अंतरात अशा रीतीने राहत असताना, तुमच्या आतून तुम्हाला त्यांनी काही सांगणे किंवा काही शिकवणे ही काही आश्चर्याची गोष्ट नाही. मुक्तानंदाचे हे सत्यवचन आहे, की श्रीगुरू पूर्णपणे तुमचे आहेत; परंतु तुम्ही पूर्णपणे त्यांचे झाला नाहीत. ते तुमच्यापासून किंचितही दूर नाहीत, तुम्हीच त्यांच्यापासून दूर आहात. याच कारणामुळे अंतरीच्या नित्यनवीन साक्षात्कारापासून तुम्ही काहीसे दूर जाता.

माझी गुरुनिष्ठा मोठी पक्की होती. कुठेही गेलो तरी माझ्याजवळ गुरुदेवांचा फोटो असणे जरुरीचे असायचे. फिरायला गेलो तर बरोबर फोटो, खायला बसलो तर बरोबर फोटो. झोपतानासुद्धा फोटो जवळ घेऊन झोपत असे. इतकेच नव्हे तर स्नानगृहातही फोटो ठेवीत असे. लोक काय वाटेल ते म्हणोत. अस्तु.

श्रीगुरुदेवरूप अंतर्ज्योतीकडून किंवा मी पूर्वी वर्णन केलेल्या सर्वज्ञलोकातून अशी सूचना मिळाली : “अरे मुक्तानंद! नीलेश्वरीच्या दर्शनाने जीवनमुक्ती प्राप्त होऊनसुद्धा, तुरीयानंदाची अनुभूती होऊनसुद्धा, अजून पूर्ण प्राप्ती बाकी आहे. दिव्य साक्षात्कार हा नाही. त्यासाठी तर तुला नीलबिंदूत आणखी प्रवेश करावा लागेल.”

अंतरातून चिती पारमेश्वरीचा असा संदेश मिळाला. मी हा आदेश सत्य मानून अधिक ध्यान करायला सुरुवात केली. जसेजसे ध्यान वाढले, तसतशी नीलेश्वरीही जास्त काळ स्थिर राहू लागली. जसजशी ती थांबून राही, तसतसे तिचे तेज अधिक वाढू लागे. जितका वेळ ती स्थिर राही तितकीच तिची रितिनीती, चमत्कार आणि नावीन्य नवीननवीन होऊ लागत.

खरे विचाराल, तर तो नील आहे की श्रीनीलकंठ? तो नील आहे की नीलवर्णाचे श्रीनित्यानंद? तो नील आहे की निळ्या रंगाची नीलेश्वरी भवानी उमाशक्ती कुंडलिनी? अशा अनेक भावना अंतरात उसळत असत. नीलेश्वरी आता जवळ येत चालली.

जसजसा नील वाढू लागे आणि त्याची चमक वाढू लागे; तसतसा मुक्तानंदही वाढू लागे, मुक्तानंद बदलू लागे, मुक्तानंद खुलू लागे, मुक्तानंद सर्वत्र पसरू लागे आणि जाणू लागे, की मुक्तानंद म्हणजे काय आहे. जी-जी गती नीलाची होत असे, ती-ती गती मुक्तानंदाची होत असे. आता नीलावरची माझी निष्ठा अधिकच दृढ झाली. ज्याप्रमाणे शरीराच्या अवयवांवर ‘हे माझे आहेत’ किंवा ‘ते मीच आहे’ अशी प्रत्यक्ष निष्ठा असते, तशीच निष्ठा मला नीलाबद्दल वाटू लागली.

© २०२१ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.

स्वामी मुक्तानंद, *चित्शक्ती विलास* [चित्शक्ती पब्लिकेशन्स, २०१३] पृष्ठ १८१-१८३.